# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकसत्ता पुणे
गुरुवार, ८ सप्टेंबर २०१६

### राजगुरू महाविद्यालयातर्फे वनसचेतन शिबिर

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे १४० स्वयंसेवक सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्याच्या परिसरात टाकला जाणारा प्लास्टिकचा कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील हेतू होता. या वेळी विद्यार्थ्यांनी करंज, एरंड, सुबाभूळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, जेट्रोफा, आंबा, चिंच, लिंब, बकाना, शेवगा, बोर, बाभूळ या वृक्षांचे बीजारोपणही केले. या शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. एस बी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रूपाली वाघाळ, प्रा. श्वेता थोरात, प्रा. नीलम काळे, प्रा. शीतल बोन्हाडे यांनी केले होते.

पुणे जिल्हा उत्तर ११ पुढारी | पुणे, शनिवार ३ सप्टेंबर २०१६

### राजगुरू महाविद्यालयाचे वनसचेतन शिबिर

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**



भीमाशंकर अभयारण्यात वनसचेतन शिबिर प्रसंगी बीजारोपण करताना विद्यार्थी.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियान बुधवारी (दि. ३१ ऑगस्ट) राबवण्यात आले. वनसचेतन शिबिरात १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शिबिराचे हे चौथे वर्ष होते.

विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी व बाहेरून येणाऱ्या पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लास्टिकचा कचरा जमा व्हावा या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात खुरप्याच्या साहाय्याने खड्डे घेऊन करंज, एरंडी, सुबाभूळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, जेट्रोफा, आंबा, चिंच, लिंब, बकाना, शेवगा, बोर, बाभूळ आदी वृक्षांच्या १५ किलो सेंद्रिय पद्धतीने बीजप्रक्रिया केलेले बी बीजारोपण केले.

विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मिळ असा शेकरू प्राणी व ब्लूमॉरमॉन फुलपाखरांची ओळख करून घेतली. त्यांना भीमाशंकर व परिसराची ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक स्वरूपाची माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक व डॉ. महेश घाडगे यांनी दिली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादी घनकचरा विद्यार्थ्यांनी जमा केला. या वनचेतन शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रुपाली वाघाळ, प्रा. श्वेता थोरात, प्रा. नीलम काळे, प्रा. शीतल बोन्हाडे यांनी केले.

सकाळ
बुधवार, ७ सप्टेंबर २०१६
४

# राजगुरू महाविद्यालयाचे वनसचेतन शिबिर

चोरणिरी, ता. ६ : चोरणिरी (ता. खेड) येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने भीमाशंकर अभयारण्यात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियान राबविले. या अभियानात एकशे चाळीस स्वयंसेवक सहभागी झाले होते.

भीमाशंकर मंदिर परिसरात पर्यटक व भाविकांकडून मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कचरा टाकला जातो. तो कचरा शिबिरार्थी विद्यार्थ्यांकडून साफ करणे व विद्यार्थ्यांना जंगल परिसरातील विविध वृक्ष, वेली आणि प्राणी व फुलपाखरांची माहिती व्हावी, हा या शिबिराचा मुख्य हेतू होता.

शिबिरात विद्यार्थ्यांनी करंज, सुभाबूळ, जांभूळ, आंबा, करवंद, बोर या बियांची लागवड केली. जंगलात विद्यार्थ्यांना शेकरूचे दर्शन झाले. ब्लू मॉरमॉन या फुलपाखरांची माहिती करून घेतली. वन पर्यटनाबरोबर विद्यार्थ्यांनी भीमा नदीतून वाहून आलेले प्लॅस्टिक गोळा केले. दरवर्षी हा उपक्रम राबविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.

शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. श्वेता थोरात, प्रा. नीलम काळे, प्रा. शीतल बोऱ्हाडे यांनी केले.

संध्या मंगळवार, दि. ६ सप्टेंबर २०१६ ७

# राजगुरु महाविद्यालयाचे भीमाशंकर अभयारण्यात वनसचेतन शिबीर संपन्न

माळशिरस (जीवन कड) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबीर व स्वच्छता अभियानाचे नुकतेच आयोजन करण्यात आले. यात सुमारे १४० स्वयंसेवक सहभागी झाले. शिबिराचे हे चौथे वर्ष आहे. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयअरण्य परिसरात टाकला जाणारा प्लास्टिकचा कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात खुरप्याच्या साहाय्याने खड्डे घेऊन करंज, एरंडी, सुबाभुळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, जेट्रोफा, आंबा, चिच, लिंब, बकाना, शेवगा, बोर, बाभूळ इ. वृक्षांच्या १५ कि. लो. बियांचे सेंद्रिय पद्धतीने बीजप्रक्रिया करून बीजारोपण केले.



विद्यार्थ्यांनी अभयअरण्य परिसरात भटकंती करून दुर्मीळ असा 'शेकरू' प्राणी व 'ब्लूमॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. त्यांना भीमाशंकर व परिसराची ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक स्वरूपाची माहिती प्रा मच्छिंद्र मुळूक, डॉ महेश चाटे यांनी दिली. भीमाशंकर अभयअरण्य व मंदिर परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादि वनकचरा विद्यार्थ्यांनी जमा केला. या वनसचेतन शिबीर आयोजन प्राचार्य डॉ एस बी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ संजय शिंदे, प्रा दिलीप मुळूक, प्रा रुपाली वायाळ, प्रा. श्वेता थोरात, प्रा. नीलम काळे, प्रा शीतल बोऱ्हाडे यांनी केले.

केसरी ६ सप्टेंबर २०१६ १०



# राजगुरु महाविद्यालयाचे वनसचेतन शिबिर संपन्न

राजगुरूनगर (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भीमाशंकर अभयारण्याच्या परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे १४० स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिबिराचे हे चौथे वर्ष होते.

विद्यार्थ्यांना जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभअरण्य परिसरात टाकला गेलेला प्लास्टिक कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. यावेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात करंज, एरंडी, सुबाभुळ, जांभूळ, सीताफळ, करवंद वृक्षांची लागवड देखील केली. विद्यार्थ्यांना भीमाशंकरची माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. महेश धाडगे यांनी दिली. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. एस बी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. श्वेता थोरात, प्रा. नीलम काळे, प्रा.शीतल बोऱ्हाडे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख